# <u>दुरभिमान</u>

देवाचा धर्माचा देशाचा भाषेचा
इतुकेच काय
कुळाचा वेषाचा वाटेल त्याचा
धरा अभिमान
निश्चित मनात खचित बाळगा
परी सर्वकाळ
सुकाळी दुकाळी एकाही गोष्टीचा
नको दुरभिमान
अभिमान स्वाभिमान जरी भला
चांगला अती न
बनवी तो आत्मकेंद्री आपल्याला
असा अमर्याद
बदलतो मग तोच जीवनाचा
अर्थ, होतो स्वार्थ
मिळे दुरभिमान दूर राखता
अर्थ परमार्थ

– नारायण
०८/२८/२३